# गोखले आणि–




पु. पो. गोखले, कऱ्हाड.

# शेवटचें पान.

१ ' सेनापति गोखले ' हें व्याख्यान १९३१ च्या माघ शु॥ १९ ला कऱ्हाड येथें झालें.

२ ' ना. गोखले ' यांची पुण्यतिथी कऱ्हाडचे मनोरंजक वाचनालयांत ता. १९।२।३१ रोजीं श्री. रामभाऊ देव इनामदार, B. A., यांचे अध्यक्षतेखालीं साजरी होऊन श्री. बाळकृष्णपंत कोल्हापुरे यांचें व्याख्यान झालें होतें. त्यावेळीं उपवक्ता ह्मणून मी जें बोललों तें ज्ञानप्रकाशच्या ता. २४।२।३१ च्या रिपोर्टप्रमाणें दिलें आहे.

३ ' महाराष्ट्राचे पंचप्राण ' हें पुण्याचे श्रीगणेश मोफत-वाचनालयांत गणेशव्याख्यानमालेचें दहावें पुष्प ह्मणून इतिहासाचार्य श्री. दत्तो वामन पोतदार यांचे अध्यक्षतेखालीं दिलेलें व्याख्यान मुंबईच्या ' लोकमान्य ' दैनिकाचे ता. २७।२।२९ चे अंकावरून दिलें आहे. सदर व्याख्यान ता. २४।२।२५ रोजीं झालें होतें.

४ ' साहे ओझें त्यास तोंचि द्यावें ' हें वाईचे वसंतव्याख्यान मालेंत ता. ७।९।२८ रोजीं दे. तात्यासाहेब नित्सुरे यांचे अध्यक्षतेखालीं दिलेलें व्याख्यान साताऱ्याच्या समर्थावरून व कऱ्हाडचे अभ्युदयावरून दिलें आहे.

आमच्या इकडे लघुलेखकाचे रिपोर्ट नसतात. ह्मणून वक्तयाचे भाषणाचा सारांशच प्रसिद्ध होतो. अर्थात् तोच येथें दिला आहे. मी वक्ता नाहीं. जिभेचा उपयोग लोकसेवेंत करणारा आहें. जिभेचा उपयोग परिणामकारक होतो आणि कित्येक वेळां चिरस्थाई वाग्मय निर्माण करतो. पण साताऱ्याच्या श्री. निफाडां-सारखा बिनचूक टिपून घेणारा मिळत नाहीं ह्मणून तें वाग्मय स्थायी होत नाहीं. हें स्थानमहात्म्य आहे ! तरीपण ' निर्बाहः प्रतिपन्नवस्तुषु '।

कऱ्हाड जानेवारी १९३४. पु. पां. गोखले.

# सेनापति बापू गोखले.

खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या नाना फडनवीसाबरोबर मराठे-शाहीची मुत्सद्देगिरी लोपली, तशीच सरदार नरहर गणेश गोखल्यांच्या बरोबर महाराष्ट्राची तरवारबहादरीही लोपली ! ! भावप्रधान हृदयाच्या या ऐतिहासिक समजुती एकांगी आहेत. सत्तावनच्या शिस्तसूट स्वातंत्र्य-युद्धांत महाराष्ट्राची चमकलेली समशेर आणि युक्तिबाजी डोळ्याआड केली किंवा झाली; क्लाइव्ह, हेस्टिंग्ज यांच्या वारसदारांनीं रचलेल्या हिकमतींनीं आपल्या यशाच्या पायीं येथील स्वार्थी व सुखलोलुप प्रस्थें आक्रांत केलेलीं पाहिलीं; नव्या इंग्रजी राजवटीच्या गरजत्या प्रवाहानें बाजूस सारून कुठल्याकुठें वेरून टाकलेलीं स्वातंत्र्यभक्तीचीं पाळेंमुळें बिलकुल लक्षांतच आणलीं नाहींत म्हणजें स्वराज्यसेवेंत शेवटीं तळपलेल्या तळेखाजणाच्या तरवारीनंतर महाराष्ट्र तसल्या दिमाखाला पारखा झाला म्हणून भावविवश हृदयाला हळहळ वाटणें स्वाभाविक आहे. तथापि नुकतेंच सूचित केल्याप्रमाणें फल्गुनदीसा-रखाच हिंदी मुत्सद्देगिरीचा व रणबहादुरीचा प्रवाह अखंड वहात असल्याकारणानें प्रयत्नांतीं महाराष्ट्रास पुन्हां राष्ट्रीय- राजकीय प्रयाग करतां येईल अशी खात्री आहे; आणि म्हणूनच झालें तरी बापूसाहेब गोखल्यासारख्या " जवानमर्दा "चें पुण्यस्मरण करावयाचें !

सदाशिवरावभाऊ पानपतच्या घनघोर संग्रामांत बेपत्ता झाले, तसेंच गोपाळअष्टीच्या तुंबळांत बापूसाहेब गोखले स्वराज्याच्या कामास आले. भाऊसाहेब पेशव्यांच्या पत्नी पार्वतीबाई पतीचा मागमूस नाहीं म्हणून सौभाग्याच्या वेड्या आशेनें अहेवपणें राहिल्या यांत नवल तरी नाहीं; पण बापूंच्या पत्नी यमुनाबाई यांनीं गोपाळअष्टीला बापूंचा

थोडा रक्तबंबाळ पाहिला असूनही पतीच्या रणाहुतीची खात्री धरली नाहीं व १८४२ मध्यें ब्रह्मावर्ती कैलासवास येईपर्यंत त्यांनीं सौभाग्य-लेण्याची प्रतिष्ठा सोडली नाहीं. बापूंच्या पत्नीची निगा व्यवस्थित राहावी आणि बापूंचें नांव पुढें चालण्यासाठीं यमुनाबाईनीं दत्तक घ्यावा व त्याबद्दल त्यांचा सरंजाम पुढें चालू रहावा अशी इच्छा स्वराज्याचें उदक माल्कमसाहेबांच्या हातावर सोडतांना खुद्द रावबाजींनीं व्यक्त केली होती व कुंपणीसरकारचे प्रतिनिधि 'एल्फीनष्ट' साहेबांनींही माल्कमप्रमाणेंच त्या इच्छेस दुजोरा दिला होता. नाना फडनवीस अगर खुद्द कारभारी पेशवे यांनीं सदाशिवरावभाऊंच्या संशयी विधवेला सुख लागावें म्हणून "प्राणांचे कोट" उभारले, यांत आपुलकीचा, स्वामिनिष्ठेचा व जनलज्जेचा कांहीं भाग असल्याचें तरी म्हणतां येईल. पण बापूसाहेब गोखल्यांच्या बाबतींत त्यांची कसास उतरलेली स्वामिनिष्ठा आणि शत्रूसही आदरणीय वाटलेलें चारित्र्य व शूरत्व याशिवाय कशास अधिक गुण देतां येतील ? राव-बाजींचा आणि कुंपणीसरकारचा शेवटचा संग्राम होण्याचा वख्त गुदरला असतां, बापूसाहेब गोखल्यांनीं रावबाजींना रामराम ठोकावा म्हणून फोडाफोडीचा कुटिल डाव टाकण्यास इंग्रजी नीति चुकली नव्हती. लिंगो भगवान् नांवाचे वकील सरदार गोखल्यांच्याकडे आले आणि बोलणें करूं लागले कीं "तुम्ही पेशव्यांच्या नोकरीस लागलां, त्यावेळीं आम्ही आपल्यासंबंधी खातरजमा दिली होती. ही गोष्ट न विसरतां, आमची दोस्ती ओळखून हल्लींच्या प्रसंगीं वागावें." फितुरीच्या या इंग्रजी निरोपाला बापूंनीं काय उत्तर दिलें ठाऊक आहे ?

बापू गोखले म्हणाले " तुम्ही खातरजमा दिली ही गोष्ट खरी; पण आज मी आपल्या म्हणण्याप्रमाणें वागल्यास आपणासच बट्टा; व शिवाय मला हरमपणा येईल. नोकरानें केव्हांही इमानानें वागलें पाहिजे. आपण मला दौलत द्याल; पण स्वामिद्रोहानें लोकापवाद तर येईलच शिवाय नीतिदृष्ट्या अधःपात होऊन परमेश्वराजवळ मी गुन्हेगार ठरेन. स्वामिकार्यांत प्राण गेल्यासही हरकत नाहीं, पण माझ्या हातून आपण म्हणतां तसें होणें शक्य नाहीं." राजतरंगिणींत म्हटल्याप्रमाणें " श्लाघ्यः स एव गुणवान् रागद्वेषबहिष्कृतः । भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती " असा बरकंदाज ब्राह्मणभाई बापू गोखले आहे हें कुंपणीसरकारच्या धुरंधरांना ठाऊक होतें. टिपूसुलतानाचा बीमोड करण्यासाठीं मराठ्यांनीं व इंग्रजांनीं ज्यावेळीं दोस्तीनें खांद्याला खांदा भिडविला होता, त्यावेळींच आर्थर वेलस्लीस — आणि बापू गोखले यास ' वसली ' साहेब म्हणत — बापूंची योग्यता कळली होती. आणि असें असूनही " अतीत्यहि गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते " या न्यायानें इंग्रजी कारस्थान शेवटीं आपल्या वळणावर गेलें, त्याचा उल्लेख मागें आलाच आहे. इंग्रज-मराठ्यांचें गोपाळअष्टीला शेवटचें तोंड लागावयाचें— अशा लगीनघाईला खुद्द मालक रावबाजी बापूंना कमी नव्हते टाकून बोलले !

" उत्खातान् प्रतिरोपयन् कुसुमितांश्चिन्वन् शिशून् वर्धयन्
प्रोत्तुंगान् नमयन् नतान् समुदयन् विश्लेषयन् संहतान् ।
तीव्रान् कंटकिनो बहिर्नियमयन् म्लानान् मुहुःसेचयन्
मालाकार इव प्रयोगनिपुणो राजा" रावबाजी नसल्याकारणानें व हुशार,

शूर आणि बापू गोखल्यासारख्या रणनोवऱ्याबरोबर रणांगणीं राहण्यांत कसूर करणारा नसला तरी त्रास्य व सुखलोलुप असल्याकारणानें, निपाणीकर सरलष्कराच्या बोलण्याला भाळून पेशवाईचा हा मेरुमणी बापू गोखल्यांचा सल्ला झिडकारून खुशाल जेवण झोडपीत बसला. इंग्रजांचा छापा नेमका कसा त्यावेळीं आला! तेव्हां बापूंनी इषारा केला असतां, तो न खपून श्रीमंत खेकसले कीं "आपण शूर, सावध व कुशल हें जाणून तुमच्यावर आम्हीं विश्वास ठेवून बेफिकीर असावें, तों आपण नेहमीं मिष्काळजीनें वागून आयतेवेळीं गडबड करावी." पुऱ्यांत मसाला कमी घातल्याबद्दल आपल्या पुतण्याला शमसुद्दीनानें सुळीं दिलें अशी अरबी भाषेत एक गोष्ट आहे, तिची या प्रसंगीं आठवण होते. रावबाजींच्या शद्बाला नोकरजातीनें एकच जबाब दिला कीं- "दुसऱ्याचें ऐकून कालचा बेत बिघडविला, व आमच्यावर आतां रोष झाला. सेवकावर स्वामीची गैरमर्जी झाली असतां त्यानें लढाईंत स्वामिकार्यीं मरावें किंवा जय संपादून त्यास भेटावें हेंच योग्य. तेव्हां आपण भोजन सावकाश करून निघावें; आपलें चरणदर्शन पुनरपि होईल तर ठीकच; नाहींतर हेंच शेवटचें." (पाच्छापूरकर) या जबाबानिशीं बापूंनीं घोड्याला टांच दिली आणि प्रतिपक्षी इंग्रजांस-

"प्रहर नमतु चापं प्राक्प्रहारप्रियोऽहं ।
मयि तु कृतनिघाते किं विदध्याः परेण ॥"

असें महा-वीर-चरित सांगितलें व आपला शद्ब खरा केला. लोकहितवादींनीं संग्रहित केलेल्या ऐतिहासिक गोष्टींत (क्रमांक ८) हरीभाऊ देशमुखांची अशी साक्ष भरली आहे कीं "लढाईची बातमी ऐकतांच

आनंदानें नाचत जाणारे दोन्हे शिपाई पाहिले. एक बापू गोखला व दुसरा परशुरामभाऊ पटवर्धन. या दोघांनीं लढाईची बातमी ऐकतांच त्यांचे बाहु स्फुरण पावत असत ! अंगरख्याचे बंद तुटत असत! जमीनींतून गोळ्या उसळत असल्या आणि तसेंच चहूंकडून गोळ्यांचा वर्षाव सारखा होत असला तरी हे दोघे पुरुष तेथें जाऊन छाती करून उभे रहात. घोडा गोळी लागून जरी पडला तरी तेथेंच दुसरा घोडा आणवून त्यावर स्वार होत, पण दोन पावलेंही मागें घेत नसत ! ! " गोपाळअष्टीलाही अशीच मातबर लढाई बापूनीं दिली. विश्वासरावांसारखा उद्यांचा पेशवा रणांगणीं पडल्यामुळें निकराचा हल्ला चढविण्याच्या उद्देशानें सदाशिवराव भाऊनीं उदगीरच्या इर्षेमीनें घोडा घातला. लढाईच्या धुमश्चक्रींत जुन्नरप्रांतीं एकुलता एक मुलगा गोविंदराव ऊर्फ बाबासाहेब ज्वराला बळी पडला, सून सती गेली तरी स्वराज्यसेवेच्या इर्षेमेनें बापूंनीं जीवाच्या करारावर आपली रण-मस्त ' तोफ डागली.' स्वतां धुतल्या तांदळासारखा नीतिशुद्ध असा हा नर-हरि आपलीं ह्मणविणारीं माणसेंही नीतिशुद्ध राखण्याची अत्यंत खबरदारी घेई. या कामीं बापूंची जरब अशी विलक्षण होती कीं ठाकूरदास बोवांचे शिष्य बापू गोखले पायांत चाळ बांधून भजन करीत तेव्हां त्यांच्यामागें पखवाज वाजविणारा विठोबा कोंडितकर गुरव कोणाही कसबिणीच्या मागें वाजवावयास चुकूनसुद्धां जात नसे. असा चारित्र्याची कदर ठेवणारा रणशूर गोपाळअष्टीच्या संग्रामाचा नायक होता. मराठ्यांच्या नजरेनें १७६१ चें पानपत, १८१७ ची गोपाळअष्टी दोनही नामुष्कीची झाली असें कोणी ह्मणेल; पण युद्ध-

नीतिविशारदास, पहिलें पुनरुज्जीवनाची पाऊलवाट ठेवण्याइतकें कल्याणकारक तर दुसरी पारदर्शक पण प्रथमदर्शनी दृष्टी अंध करणारी व मोहणारी नी भोंवणारी अशी कथा झाली असें वाटेल. चुलत्याला यमसदनाला पाठविणाऱ्या धोंडजी वाघाचें डोकें ठेंचणारा आणि आपल्या रणकंकणाची राख त्याचवेळीं डाव्या डोळ्यावरील जखमेनें बांधणारा बापू गोखल्यासारखा सिंहाचा बच्चा, छत्रपती शिवाजीमहाराजांच्या स्वराज्याचा शेवटचा आधारस्तंभ होता. सतराव्या शतकाच्या पन्नाशींत छत्रपतींच्या लढायांनीं हिंदवी स्वराज्याचें बीजारोपण झालें; अठराव्या शतकाच्या आरंभकाळीं समाप्त झालेल्या "तीस वर्षांच्या मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धानें" स्वराज्याचा वृक्ष महत्वाकांक्षेच्या अमर्यादपणानें मोहोरला; अटकेपार गेलेल्या पराक्रमविस्ताराची छाटाछाट आठराव्या शतकाच्या 'एकसष्टीनें' पानिपतीं केली; आणि एकोणिसाव्या शतकाच्या ऐनविशींतच तो स्वराज्यवृक्ष बापू गोखल्यांसारख्यांच्या हाडारक्तांचा उपयोग न होतां उन्मूळून पडला! महाराष्ट्राच्या कर्तबगार पुत्रांनो आणि निराशलेल्या अंतःकरणांनो, वरील प्रत्येक प्रसंगीं सुंदोपसुंदी नव्हती असें नाहीं; प्राटेस्टंटचा क्याथालिक, क्याथालिकचा प्रॉटेस्टंट झालेल्या रेनॉल्डबंधूसही लाजविणारी आपआपसांतील भाऊबंदकीची पाटीबदलही कमी नव्हती; पण "हंसें मुक्ता नेली - मग केला कलकलाट काकांनीं" या पदवीला पात्र होऊन आपली, आपल्या देशाची आणि मानवी संस्कृतीची मानहानी होऊन द्यावयाची नाही अशीं सत्यनिष्ठ व स्वदेशसेवक कांहीं अंतःकरणें होतीं. लढाईची

ताकद तुझ्या अंगांत असतांना, महाराष्ट्रा ! बापू गोखल्यांच्या मृत्युबरोबर तुझ्या स्वातंत्र्याचा अंत झाला, तो माघ शु॥ पौर्णिमेला झाला ! आजच्या निःशस्त्र स्थितींतून कोणत्या संवत्सरीं कोणत्या तिथीला आणि कोणत्या उत्क्रांतीनें तुझ्या भावी स्वराज्याचा उदय होऊन तें यावच्चंद्र दिवाकरौ टिकावयाचें आहे, तें काळाच्या कपाळीं तुझे जातिवंत पुत्र जें कर्तबगारीचें शिक्कामोर्तब करतील, त्यावर सर्वथैव अवलंबून आहे.

---

# नामदार गोखले

ना. गोपाळराव गोखल्यांची आठवण झाली कीं, अभ्यासू अंतःकरणातून उद्गार सहज निघतात कीं, " परदुःखेन दुःखिता विरलाः " प्रयत्नशील विद्यार्थीदशेचा परिपाक स्वार्थाचा सह्याद्री उभारण्यांत सहज होण्याचा संभव असतांना व हात जोडून स्वागत करीत असलेल्या सुखसंपत्तीला रामराम ठोकून, सुधारलेल्या राष्ट्रांनीं कःपदार्थ लेखलेल्या आपल्या मायदेशाची वकिली यशस्वी व मुद्देसूदपणानें करण्याचें गोखल्यांनीं पत्करलें; इंजिनियर होण्यापेक्षां ज्या गोखल्यांनीं राष्ट्रीय कल्याण साधण्यासाठीं विधायक आराखडा काढून चिरंतन असें कार्य केलें; नोकरीची लालसा सोडून ज्या गोखल्यांनीं ' नम्र भारतसेवक ' होण्यांतच भूषण मानलें आणि आपल्या भारतसेवक संस्थेच्या स्थापनेनें दुसऱ्यांनाहीं तसेंच वाटावयास लावलें त्याबद्दल

राष्ट्रभूमीला नितांत कृतज्ञता वाटते. हिंदुस्थान परतंत्र आहे अशा स्थितींत आपल्या विनयशील पण तेजस्वी अभ्यासानें 'हिंदुस्थानचा ग्लॅडस्टन' म्हणवून घेण्याइतका दर्जा ना. गोखल्यांनीं प्राप्त करून घेतला होता. खंबीर बुद्धि, पीळदार स्वभाव व उत्कृष्ट भावना हे त्यांचे गुण तरुणांनीं मुद्दाम लक्षांत वागवावे. तोंडाबाहेर काढलेल्या आपल्या प्रत्येक शब्दाला ना. गोखले आत्मविश्वासानें इतकी किंमत आणीत कीं लॉर्ड कर्झनसारख्यासही गोखल्यांच्या अंत:करणशुद्धते-बद्दल नितांत आदर वाटे. ऐन एकोणीसाव्या वर्षापासून गोखल्यांनीं स्वत:स सार्वजनिक कार्यास वाहून घेतलें होतें, हें तरुणांनीं लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. लो. टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें "इंद्रियशक्ति शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठीं उद्योग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर आहे, आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ती होणें साहजिक आहे. अशा वेळीं आणि विशेषेंकरून या दिशेनें गेलें असतां आपणास यश मिळण्याचा काकणभर अधिक संभव आहे, अशी मनास खात्री वाटत असतांही या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टी मागें ओढून यथाशक्ति आपणास देशकार्यास वाहून घेणें, त्यांत आलेलीं संकटें सोसण्यास कबूल असणें किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणें याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागत असतो. आणि तो मनोनिग्रह ज्यानें दाखविला इतकेंच नव्हें तर आमरण कायम ठेविला, तोच पुरुष धन्य होय." न्या. मू. रानडे यांचें जीवनरहस्य म्हणजे मातृ-भूमीच्या चरणीं त्याग आणि कार्य यांचीं सुमनें वाहणें हें होतें

असें ना. गोखल्यांनीं एके ठिकाणीं सांगितलें आहे. तेंच त्यांनीं स्वतां आचरून दाखविलें. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकण्याची बुद्धि महाराष्ट्राला हांवो अशी प्रार्थना आहे. "

---

## " महाराष्ट्राचे पंचप्राण "

आधुनिक काळाचा विचार करतां न्या. रानडे, शास्त्रीबोवा, लोकमान्य, आगरकर, गोखले हेच आज महाराष्ट्राचे पंचप्राण वाटतात. महाराष्ट्रांत पेशवाईचा लोप होऊन जरी १८१८ त महाराष्ट्रावर

**पारतंत्र्याचें जोखड**

बसलें, तरी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं नानासाहेब वेडया आशेनें कां होईना १८५७ पर्यंत धडपडत होता. पण त्यावेळीं अपयशानें जेव्हां निराशेचा दाट काळोख पसरला तेव्हां इंग्रजांच्या व पाश्चिमात्यांच्या पराक्रमानें, युद्धसामुग्रीनें, वैभवानें व संस्कृतीनें लोक दिपून गेले आणि आपल्याला कांहीं हातपाय हालवितां आलेच तर ते येथें आलेल्या पाश्चिमात्य संस्कृतीच्या अनुरोधानें आपल्यांतील दोष आपण काढून टाकले तरच येणार आहेत, या कल्पनेनें ' लोकहितवादींनीं ' समाजाला विचारांचा सुरवात केली. परंतु इतिहासपरंपरेच्या अनुरोधानें व पाश्चात्य संस्कृतीच्या चिकित्सेनें महाराष्ट्रावर

**" सूर्योदय खास होईल "**

असा संदेश न्या. रानडे यांनीं प्रथम दिला. या संदेशाला मूर्त स्वरूप देण्यासाठीं त्यांनीं आपण पडद्यामागें राहून औद्योगिक, सामाजिक,

राजकीय चळवळींचीं सूत्रें हालविलीं. प्रार्थनासमाजाच्या रूपानें धार्मिक चळवळ प्रत्यक्ष नेटास लाविली. तरी पण यावेळीं सुशिक्षित समाज इंग्रजी तेवढें चांगलें या भुलाईनें भुलून गेला होता. आपले राष्ट्रोन्नतीचे विचार रानड्यांनीं देखील इंग्रजींतूनच मांडले. या परावलंबीपणाला कलाटणी देण्यासाठीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या निबंधमालेनें सुरवात केली व 'न्यू स्कूल' 'चित्रशाळा' हीं अस्तित्वात आणून रानड्यांच्या चळवळीस मूर्तस्वरूप दिलें. यानंतर

## लोकमान्य व आगरकर

यांच्या कामगिरीकडे लक्ष जातें. लोक स्वावलंबी, बाणेदार, निस्पृह, धाडसी आणि दोन हात करण्यास समर्थ व्हावेत अशा हेतूनें आगरकरांनीं समाजाला दोष दाखवून टोंचणी लावली. तर ज्या लोकांच्याकरितां आपण धरपड करावयाची त्यांचा पाठिंबा मिळावा म्हणून लोकांत राजकीय जागृति उत्पन्न करून नोकरशाहीशीं दोन हात करण्याची तयारी लोकमान्य टिळकांनीं केली. न्या. रानडे यांच्या राजकीय पंथास ना. गोखले यांनीं पूर्णत्व देऊन

## कर्झनशाहीसारख्या सुलतानशाहीला

तोण्ड देऊन लोकपक्षाची बाजू राखली. या सर्व गुणांची महाराष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यकता आहे. हे सर्व 'पांचजन्य' होते. आणि या सर्वांत मिळून 'सत्यं ब्रह्मदतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्मयज्ञः' हे पृथ्वीधारणेचे गुण होते.

# साहे ओझें त्यास तेंचि द्यावें.

श्रीतुकाराम महाराजांचा एक अभंग असा आहे कीं, अधिकार तैसा । करूं उपदेश । साहे ओझें । त्यास तेंचि द्यावें ॥ या अभंगाच्या उत्तरार्धावर मी आज चार शब्द सांगणार आहें व त्याचाच अर्थ किंचित फिरवून माझ्यावरील हें ओझें आपण माझ्या वकुबाप्रमाणेंच ठेवा एवढें प्रथम मला आपणांस विनयपूर्वक सुचवावयाचें आहे.

स्वातंत्र्य हें हिंदुस्थानचें ध्येय ! सळसळत्या रक्ताची आत्यंतिक दृष्टी सोडून दिली, तरी ‘ उच्च ध्येय ’ या दृष्टीनें तरी व्यवहारी राजकारण्यांना तें पटतच असतें. “ परत खेड्यांत ” हें राष्ट्रीय चळवळीचें आतां सूत्रच आहे. पण खेडकऱ्यांना आणि शहऱ्यांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं कांहीं तळमळीनें करतां आलें पाहिजे. देशांतील अणूरेणू राष्ट्रीय ध्येयानें दुमदुमून निघाल्याशिवाय पाऊल पुढें पडणें मुष्किलीचें असतें. म्हणून प्रत्येकजण कृतीचा देशभक्त झाला पाहिजे. ज्याला जें येत असेल अगर ज्या कलेची हौस असेल तें त्यानें इतक्या प्रवीणतेनें केलें पाहिजे कीं, त्यांत इतर देशाची तुलना करतां त्याचा नंबर वर लागला पाहिजे; इतकी जरी महत्वाकांक्षा प्रत्येक हिंदवासियानें धरली तरी हिंदी राष्ट्राच्या उद्धाराचें कार्यांत तें रुजू होईल. ज्याची जितपत कुवत, तितपत त्याच्याकडून राष्ट्रकार्य करवून घेणारा योजक छत्रपतींच्या तोलामोलाचा भेटल्याशिवाय तें साध्य व्हावें तसें होणार नाहीं. तसा योजक उत्पन्न व्हावयास तपस्या

लागते. ती आपण कितीशी करतों? आजकाल देशभक्ताची एक निराळी जातच निघाल्यासारखी झाली आहे. तशी स्थिती असून चालणार नाहीं, चालत नाहीं असें जगाचा इतिहास कंठरवानें बोलतो. शक्ति-मंतांचे शक्तिमंतसुद्धां जुलुमजबरदस्तीच्या योगें धुळीला मिळतात या लॉर्ड सॅलिसबरीच्या वचनाप्रमाणें साहेबाच्या पंकडीतून आपण खात्रीनें सुटूं. परंतु साहेबाच्या पदरीं अन्यायाचें माप घालतांना आपली पुण्याई आपण दाखविली पाहिजे. या हिशेबासाठीं देशांतील प्रत्येक व्यक्तीनें रोजच्या रोज अल्पस्वल्प काळ तरी राष्ट्रकार्यासाठीं दिला पाहिजे. म्हणून स्वातंत्र्याच्या ध्येयाची ध्वजा "परत खेडयांत" रोवतांना, प्रत्येकाच्या आटोक्यांत असतील असे मार्ग ग्रामसंघटकांनीं आखून दिले पाहिजेत. "साहे ओझें त्यास तेंचि द्यावें" हा शिष्टाचाराचा राष्ट्रीय आशार्थ समजूनच "सदा येता जाता" भगवच्चिंतनाबरोबर राष्ट्रसेवा कर-ण्याचा उपदेश प्रत्येकानें आपल्या मनास केला पाहिजे. साहेबाचे बूट पुसण्यांत आणि चाटण्यांत ज्यांचा काळ जातो आहे त्यांनीं देखील मायभूमीच्या हाकेसरशी कायसरच्या जर्मनाप्रमाणें अगर लेनिनच्या रशियनाप्रमाणें खडी तालीम देण्याची तयारी राखली पाहिजे; तरच तेहत्तीस कोटीचा हिंदुस्थान पारतंत्र्यांत असल्याबद्दल जपानसारखीं राष्ट्रें आपल्याला हिणवतात तें हिणवणें हिणकस ठरविणें हातचा मळ होऊन बसेल."

# आरोग्याचा राष्ट्रीय रंग.

कऱ्हाड आरोग्यमंडळाच्या तिसऱ्या वाढदिवसाचे
अध्यक्ष

श्रीयुत विनायक नारायण फणसळकर
हायकोर्ट वकील कऱ्हाड.

## यांचें भाषण.

# आरोग्याचा राष्ट्रीय रंग.

**सज्जनहो.—**

आरोग्यमंडळाचा हा तिसरा वाढदिवस. पहिल्या दोन प्रसंगीं श्रीयुत आप्पासाहेब आळतेकर आणि पुण्याचे रा. भट यांच्यासारखे अधिकारी अध्यक्ष होते, आणि त्यांची जागा आज मला भरून काढावी लागत आहे. हा योगायोग बोधप्रद आहे. हिंदुस्थानच्या उन्नत्यर्थ चाललेल्या सर्व चळवळी राष्ट्रीय भावनेनें झाल्या पाहिजेत आणि त्याची जागती जाणीव पुढाऱ्यापासून रस्त्यांतील मनुष्यापर्यंत सारख्या आंचेची झाली पाहिजे. आरोग्यमंडळाच्या या दृष्टीमुळेंच ही जागा आज मजकडे येत आहे असें मी समजतो. दे. भ. कोल्हटकर यांनीं म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या कोठल्याही चळवळींतील पुढारी दीर्घायुषी निपजल्याशिवाय तरणोपाय नाहीं. आणि त्याच्यासाठीं जीवाची धडपड करण्यास आरोग्यमंडळासारखे पक्षभेदातींत व निर्मळ साधन नाहीं. आज हिंदुस्थानची प्रजा इतकी दुर्बळ आहे कीं इतर देशाचे मानानें माणुसकीनें आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आपणास कितपत पोहोंचतो याचीही एकवेळ शंका येईल. तीन वर्षांच्या आतील मुलांच्या मृत्युचे आंकडे पाहिले, तरूण पदवीधरांच्या कमकुवतपणाकडे लक्ष गेले, मजुरी करणाऱ्या गोरगरीब बाळंतिणींचे हाल पाहिले म्हणजे अटकेपार झेंडे लावणाऱ्या आणि स्वतंत्र स्वराज्याची उभारणी करणाऱ्या भोसले, भट, शिंद्यांचेच वंशज आज भारतांत आहेत काय असा प्रश्न मेंदूला तडाखा मारून गेल्याशिवाय राहात नाहीं. शिशुसंगोपन, शिशुसप्ताह, आरोग्य सप्ताह, प्रौढविवाह,

वगैरे वगैरे प्रस्तुत काळीं सर्व ठिकाणीं जोरानें चालू असलेले उपाय आरोग्याबाबत कांहींसे फलदायी असले तरी त्यायोगें मुळास हात घातला जात नाहीं. बाळंतिणीच्या खोलीपासून तो पहिलवानाच्या तालीमखान्यापर्यंत, स्वयंपाकघरांतील सोधन्यापासून तो दिवाणखान्यांतील गालीचापर्यंत, आणि नदीकांठच्या वाळवंटापासून तो देवमंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत शारिरीक मानसिक आणि बौद्धिक शुद्धता असल्याशिवाय मनगट, मेंदू, आणि मन जोरदार होणार नाहीं, आणि त्यांच्या एकत्रित जोराशिवाय राष्ट्राच्या अभ्युदयाची गोष्ट मृगजलवत् ठरेल. साधारणपणें पाहतां प्रयत्नांती या गोष्टी साध्य करणें, पांढरपेशा गणलेल्या समाजांत व्यक्तीशः शक्य आहे पण पूर्वास्पृश्यापासून आमूलाग्र क्रान्ति घडावयास सामुदायिक प्रयत्नच झाले पाहिजेत अशा सामुदायिक प्रयत्नासाठींच स्थानिकस्वराज्यसंस्थाची उभारणी इंग्रज सरकारनें केली पण त्यांचा उपयोग व्यवहारांत खास अपुरा पडतो असा दुर्दैवी अनुभव आहे. आणि म्हणूनच मनांत आणलें तर पैशाचे, सत्तेचे आणि शाहपणाचें पाठबळ असलेल्या स्थानिकस्वराज्य-संस्थांस आरोग्यसंवर्धनार्थ मदत करण्याकरितां स्वयंशाहाणपणाच्या जोरा-वर, पण सत्ता आणि पैसा यांच्या अभावी, आरोग्यमंडळासारख्या संस्थांस पुढें यावे लागते. सहकार्य हें बलवान तर खरेंच, पण ते स्वयंस्फूर्तींचें परस्पर विश्वासाचे आणि प्रेमाचे पाहिजे. नाहींतर तेच परस्परांच्या दुबळे-पणास कारण होते. स्थानिकस्वराज्यसंस्था घेतल्या काय किंवा आरोग्य-मंडळासारख्या संस्था घेतल्या काय कोठेंही 'बारभाईचा कारभार' असतो आणि येथें ज्याचा पायपोस त्याच्या पायांत नसेल तर प्रकरणें जोडाजोडीवर येण्यास चुकत नाहींत. उलटपक्षीं सद्धेतुनें पण बेफिकीरीनें संस्थेतलि जिवंतपणा घालविण्यास संस्थेचे घटकच कारणीभूत होताना दिसतात. सर्वांचें काम तें कोणाचेच काम नव्हे ( Work of all is

work of none ) ही म्हण चांगल्या अर्थानें आचरणांत न आणतां वाईट अर्थानें आणली तर चित्र कसें दिसेल बरें ! ' केल्यानें होत आहे रे ' असें समर्थांनीं म्हटलें आहे, तें लक्षांत घेऊन ' संहतिः कार्यसाधिका ' या न्यायानें संस्थेचा प्रत्येक घटक वागत जाईल तर संस्था महासागरांतून हिमालय निर्माण करतील. स्थानिकस्वराज्यसंस्था आणि आरोग्यमंडळें ही अशा तऱ्हेनें आपआपल्यापुरती सर्वक्षम असतील तर त्यांचे सहकार्य काय करणार नाहीं ! बाजीरावास चाळीशीच्या ऐवजी अष्टादशीचे आयुष्य ते देईल आणि पळपुव्या रावबाजीला बाजीप्रभुचे धैर्य देईल. आरोग्य-मंडळानें ही गोष्ट लक्षांत ठेवून दक्षतेनें वागलें पाहिजे. स्थानिकस्वराज्य संस्थांचे दोष काढावयाचे तें त्या संस्थास कर्तव्यतत्पर करण्यासाठींच काढावयाचे हें लक्षांत वागवून आरोग्यमंडळानें सहकार्य केलें पाहिजे. स्थानिकस्वराज्यसंस्थांचा इलाजच चालत नसेल त्या ठिकाणीं आरोग्य-मंडळानें तनमनधनें करून आरोग्यरक्षकांचे काम केलें पाहिजे. पण जेथें स्थानिकस्वराज्यसंस्था चुकारतट्टूपणा करीत असतील तेथें त्यांचे सार्व जनिकरीत्या मंडळानें उद्घाटनही केलें पाहिजे. चुकारपणातही स्थानिक-स्वराज्य संस्थास आरोग्यमंडळें बगलेखालीं राखतील तर शेफारलेल्या वडीलभावास धाकट्याभावानें भरवण्याचा फार्स होऊन दोघेही कमकुवत होतील. पण हा झाला तरी सार्वजनिक अथवा गराबाहेरील व्यावहारिक आरोग्याचा मार्ग झाला. खासगी व सार्वजनिक आरोग्याची वैयक्तिक जबाबदारी समाजास पटवून देण्याकरितां डॉ. परांजपे यांनीं म्हटल्याप्रमाणें माजिक लॅन्टर्स, छायाचित्रे आरोग्यविषयक व्याख्यानें आणि प्रत्यक्ष प्रद-र्शनें यांचा पुष्कळ उपयोग होईल. तथापि ते प्रौढापुरताच. खरा आणि टिकाऊ उपाय म्हणजे आरोग्याचे बाळकडूच मुलांना पाजलें पाहिजे. त्यासाठीं मातृपदाची जबाबदारी हौसेनें पण कष्टानें संभाळणाऱ्या स्त्रीवर्गा-

लाच आरोग्याचे शास्त्रशुद्ध ज्ञान व्हावयास हवे. गर्भावस्थेपासून आई मुलाला शिकवीत असते. Men are what their mothers make them या इंग्रजी वचनांत किंवा 'मातृदेवो भव' या आपल्या संस्कृत आशीर्वादांत एकच तथ्य आहे. आणि म्हणून स्त्रियांनीं पायाशुद्ध आरोग्याचे आपल्या मुलास दिल्याशिवाय राष्ट्राच्या शारीरिक संपत्तीचा आणि दणगटपणाचा ऱ्हास थांबणार नाहीं. आरोग्यमंडळानें या दिशेनें अवश्य खटपट केली पाहिजे. नाहींतर त्यांचे प्रयत्न एकांगी होतील. मनुष्य हा अनुकरणप्रिय असतो या न्यायानें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रौढांचे वर्तन आरोग्यास बाधक न होण्याबद्दल आरोग्यमंडळें खटपट करीत असतात ते अगदीच व्यर्थ आहे असे नाहीं. तथापि संचालनेचा यशस्वी मार्ग शाळांतूनच साधण्यासारखा आहे. राष्ट्रांची रचना शाळांतून होत असते म्हणून चिमणाईपासून मुलांना आरोग्याचे धडे शाळेंत मिळतील तर राष्ट्राचे ते भावी आधारस्तंभ वेळ आल्यावर वाटेल तें ओझें सहन करण्यास समर्थ होतील. शारीरिक आरोग्यासंबंधानें आत्तापर्यंत जें विवेचन केलें तेच पर्यायानें मानसिक व बौद्धिक आरोग्यास लागू आहे. आणि म्हणून जेथें जेथें येईल संधी तेथें तेथें विवेके कार्यसाधन केल्याशिवाय आरोग्यमंडळानें राहूं नये. राष्ट्राचें आरोग्य हा राष्ट्रसंवर्धनाचा पाया आहे आणि तो पोखरण्यासाठीं हिंदुस्थानच्या हितशत्रूंचें प्रचंड प्रयत्न चालू असतां त्याकडे दुर्लक्ष करून आपला आतां एक क्षणभरही निभाव लागणार नाहीं. आपण दुर्लक्ष करूं तर आंधळ्या धृतराष्ट्राप्रमाणें आणि स्वयंप्रतिष्ठ दुर्योधनाप्रमाणें आपलें मरण आपल्याच डोळ्यानीं पाहण्याचा दुर्धर प्रसंग येईल. तो तसा येऊं नये, राष्ट्र या दृष्टीनें हिंदुस्थाननें जगावे आणि तेही वैभवशाली मर्दुमकीनें जगावें अशी आपली खरोखर इच्छा

आहे तर ह्या मायभूमीच्या सेवेसाठीं सोवळ्यांत सोवळी सेवा करावयाची म्हटले तर वाङ्मयाप्रमाणेंच आरोग्य हा एक विषय आहे. आणि म्हणून व्यापक राष्ट्रीय दृष्टीनें प्रत्येकानें या चळवळींत भाग घ्यावा आणि राष्ट्रीय दणगटपणाच्या किल्लेबांधणीस हातभार लावावा अशी माझी विनंती आहे. तशी बुद्धी परमेश्वर आपणास देवो. अशी इच्छा प्रदर्शित करून आणि आपण सर्वांनीं माझे भाषण शांतपणें ऐकून घेतले याबद्दल आपल्या सर्वांचे आभार मानून मी हिंदमातेस प्रणिपात करतो. 'वन्दे मातरम्!

——:0:——

—श्रीभुवनेश्वरी प्रेस कराड.—

# मंगलाचरण.

श्रीरामा पुरुषोत्तमा प्रियतमा धामा समाधान द्या ॥
पाणी दाउनि पाणिदार करु द्या राष्ट्रास साऱ्या नद्या ॥
बाणीं येक गुणी अरी निपटुनी स्वातंत्र्य संस्थापुनी ॥
आरोपो विजयध्वजा तरुण हा काळासही दापुनी ॥ १ ॥

अचपलपवि देहा, सत्यनिर्धारशीला ॥
अचपलगुरुजिव्हा, नीतिनैपुण्यनीला ॥
गगन-गवसणीची बुद्धि नित्य प्रभावी ॥
वितरुनि कर दासा मारुते कीर्ति-भावी ॥ २ ॥

अधर धरुनि दांती मेरुशा मुद्रिकेनें ॥
निरख नजरपातीं व्यग्रता मृत्तिके ने ॥
कमर कसुनि छाती पाय रोवोनि ठास ॥
अरिवरि नित हाती घे गदा राम-दास ॥ ३ ॥

आम्ही कोण म्हणून काय पुसता आम्ही मराठे गढी ॥
तेजस्वी इतिहास गोड अमुचा विश्वामधे बागडी ॥
मौत्सद्ये प्रतिभा-बले यशधने प्रख्यात चोहीकडे ॥
शौर्यापासुनि आमुच्या जग शिके युद्धोपयोगी धडे ॥ ४ ॥

लंगोटी कमरेस घालुनि कुणी स्वातंत्र्य संपादिले ॥
धर्माच्यासह राजकारण कुणी जोमात संगोपिले ॥
ते आम्हीच सुधा कृतीमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे ॥
ते आम्हीच शरण्य मंगल जगा ज्यांच्यामुळे साजरे ॥ ५ ॥

दिवस न पहिले ते आज मर्दूमकीचे ।
किचकट परि आले बोंचल्या दास्यतेचे ॥
उचलति पथ मोदे स्वत्व-सत्वस्थ संत ।
क्रमिति पिक बघोनी संपलेला वसंत ॥ ६ ॥

चुरुनि पद परांचे हालते प्रेत होणे ।
मरण झरदिशी ते त्याहुनी शुद्ध सोने ॥
तरिच जगि जगावे हो जरी कार्य काही ।
बनुनिच शत्र खाते राहणे योग्य नाही ॥ ७ ॥

विधि-लिखित टळेना दास्य आले कपाळी ।
निजजन-पदसेवा साधु नेमेच पाळी ॥
निजजन शिकवाया साहुनी बंदिशाळा ।
तप करित महात्मा शांत कंठोनि काळा ॥ ८ ॥

स्वदेशाविणे का मना अन्य चिंता ।
कशाची तुला ही पछाडी अहंता ॥
अहंभावना कंस-लंकेश मारी ।
तुझा पाड का त्याहुनी होय भारी ॥ ९ ॥

तुला लागते गोड हे पारतंत्र्य ।
कुणी घातला बोल रे बोल मंत्र ॥
कसे बावळे जाहलेसी खद्याळा ।
मना पूर्विचा तो कुठे शूर चाळा ॥ १० ॥

परांच्या पराण्या पहा फाडताती ।
तयाची तुला काय नाहीच खंती ॥
मना ऊठ रे ऊठ दावी धडाडी ।
अताच्या अता पारतंत्र्यास फाडी ॥ ११ ॥

मरणहि बरवे गा पारतंत्र्याहुनी या ।
उगिच तुज कशाला मी हवे हे कथाया ॥
जलजलनिधि माजी नेउनी ओतण्यानें ।
अचुक पदरि मौर्ख्यी बांधुनी छान घेणें ॥ १२ ॥

कशी लागली पारतंत्र्यांत टाळी ।
मना विश्व सारें पहा हें कुटाळी ॥
जिवा अर्पुनि सेवि स्वातंत्र्य तान्हा ।
तुझ्या भक्तिचा हो कसा नेत्र कान्हा ॥ १३ ॥

तुझा राम जावोनि येही अयाई ।
तयाची तुला खंत कांहींच नाहीं ॥
हनूमंतही ज्या सुखे वंदिताहे ।
मना ते मराठी कुठें तेज आहे ॥ १४ ॥

मराठी मनाच्या मराठेपणानें ।
हवी जागृती घ्यावया मीपणानें ॥
स्वरक्ते स्वखड्गे स्वबुध्या झिजावे ।
स्वयंनिर्णये शांतिसाम्राज्य घ्यावे ॥ १५ ॥

प्रभो या मराठी मनामाजि राहे ।
तुझे ते तुला मी स्वये वाहताहे ॥
मधु स्फूर्ति दे की करायास कार्या ।
जये मायभू धन्य व्हावीच आर्या ॥ १६ ॥

मना सज्जना अंतरी शोध घेई ।
कशी दुःस्थिती भारता आज येई ॥
कुणी नागवी हे पहा भारताला ।
उठी हात घाली अता भूतलाला ॥ १७ ॥

हे एक एकच तुला प्रभु मागणे गा ।
जिंव्हा न उच्चरु दुजे डुलताहि पेंगा ॥
वेळेस न्हाउनि मुदे मम आर्य रक्ती ।
होवो स्वतंत्र विजयी प्रिय मायभू ती ॥ १८ ॥

भीती भीत मना जिथे न दुसरे सत्याविणे बोलणे ।
ज्ञानप्राप्तिस सर्व मार्ग उघडे बेकी न लोका घणे ॥
प्रज्ञा रूढित लुप्त होत न जिथे उद्योग दे पूर्णता ।
स्वातंत्र्यात मदीय देश विहरो जेथे प्रभु प्रेरता ॥ १९ ॥

स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रजीवनकरा देवी जिजाईसुता ।
आर्या संस्कृतिसुंदरा नरवरा श्रीरामदासामृता ॥
नीती-कीर्ति-धृतिधरा बुधवरा श्रीमन्महामंगला ।
ओपा दिव्य कृपा पदा प्रियकरा हा दास हो लागला ॥ २० ॥

स्वदेशहितचिंतने निजमतिं सदा योजते ।
स्वदेशहितरक्षणेऽर्पितधनो मुदा सर्वथा ॥
स्वदेशपदपंकजे रततनुः सुधीरो नरो ।
भवेदिह पदे पदे प्रभुपदे नतप्रार्थना ॥ २१ ॥

---

श्री भुवनेश्वरी प्रेस, कराड.

# कसोटी.

ओसाड माळ न दिसे जल वृक्ष कोठें ।
पायीं खडे खुपत बोचत तीक्ष्ण काटे ॥
तो पाखर्डा वरुनि सूर्यहि सर्व आग ।
राहे सुशील टिकुनी लव हो न भंग ॥ १ ॥

साधी राहणि नी विचारसरणी उच्चा जगीं ठेवुनी ।
स्वार्थाला अगदी पुरा विसरुनी निष्कामता सेवुनी ॥
देहाते झिजवी सदा जनहिता साधावयाकारणें ।
सेवी जो जनतेस तो प्रभुसही शंकेस ना कारणे ॥ २ ॥

डोकेफोडहि डोंगरी डवरुनी विद्येस विस्तारिलें ।
पोटाच्या सुखिं पोषणार्थ भलतें कौशल्य उंचावले ॥
देशाच्या हितकारणींच झटण्या झाली न बुद्धी जरा ।
धिक्कारी शतदां स्वतांप्रति मना निर्धारुनी वावरा ॥ ३ ॥

आर्या संस्कृतिला मिळोनि अवश्या अन्या स्वये भारतीं ।
स्वर्ग प्राणसखा कवींद्रमतिचा येईल कीं भूप्रती ॥
विश्वाच्या प्रगतीस दे न कर तें निर्लज्ज खोटें जिणें ।
व्यर्थी व्यर्थ तसें नकोच अपणा राखोनि माथीं ऋणें ॥ ४ ॥

नराची परीक्षा खरी होय कैशी
विना देखिल्या मारि कैशी लढाई ।
खडे चारुनी नीच शत्रूस कैसे
करी त्यावरी रोज जास्ती चढाई ॥

खडा ठाकतो दंड ठोकोनि कैसा
        विधीच्या सवेंही करायास कुस्ती ॥
जगा दावि पाणी कसें अंगि बाणे
        समुद्रांत सांडोनि सारीच सुस्ती ॥ ५ ॥

नसावाच मार्गी खडा अल्प काटा
        गुलाबी हसें भूषवी उत्तमाला ।
जरा तीक्ष्ण आवाज होतांच कांहीं
        दरारोनि अंगी सुटे घाम त्याला ॥
खरा भीष्म तो अंतरी मोद पावे
        उभा ठाकतां कीरिटी सामन्याला ।
मनें मर्द हातें हि कोणा बुझावें ?
        तयाची सदा काळजी ईश्वराला ॥ ६ ॥

न घावे मुळीं झोप त्या भानुराया
        म्हणोनी जगा वंद्य तो जाहलाहे ।
निघाल्या सुलाखोनि अग्नींत सोने
        सदा मूल्य सर्वत्र तें पावताहे ॥
तळोनी हि घेई यदा लाल तैली
        नृसिंहे दिली भेट त्या बालभक्ता ।
जयाला दुजा पाजितो नित्य पाणी
        अभागीपणाचा तया सर्व मक्ता ॥ ७ ॥

झाला पराजय जरी बलवंत हस्तें ।
नाहीं धजावत लघुत्व शिवावयातें ॥
सोडी भयें रण, मिळे स्वसुखें रिपूला ।
तो नष्ट काय न जिता असुनी हि मेला ॥ ८ ॥

चिरेबंदेनीं होत ना बंदिखाना ।
गजांनीं तसा पिंजराही बनेना ॥
अशा आश्रमासारिखे मानिताती ।
अहा निर्मळ शांतिमूर्ती मनें ती ॥ ९ ॥

अरिहृदय छिनाया बाण जोरांत जाया ।
दणकट धनु व्हावें ना तरी सर्व वाया ॥
कठिणच जमिनीनें ये उशी कंदुकाला ।
बनवित परि रेती कंदुका त्याच काला ॥ १० ॥

डुलवुनि जग त्याच्या शीर्षि सौख्यें वसावें ।
निजगुण विगुणांनीं उच्चतें अन्य न्यावें ॥
निज लव करणीनें विश्वहा वेडवावें ।
कृतिबहर सरे तो व्यर्थ ना भार व्हावें ॥ ११ ॥

प्रभू रामरायें जसें शीकवीले ।
जसें पांडवीं ब्रीद तें आचरीले ॥
प्रतापें तसें दाविले आचरोनी ।
मना ती नको कां तुझी बोरु वाणी ॥ १२ ॥

जिजाईसुतें ब्रीद जें दाविचेलें ।
तसें तान्हयानें रणीं राखियेलें ॥
स्वतंत्र स्त्रयें दत्त राजर्षि सांगे ।
मना आचरीं आचरीं ब्रीद अंगे ॥ १३ ॥

मना प्रार्थना तूजला हेचि आहे ।
पुराणांतरी शोधुनी गूढ पाहे ॥
निघे रे निघे एक हा-हाच अर्थ ।
पराधीनता जीवखाऊ अनर्थ ॥ १४ ॥

मना या अनर्थासि टाळावयासी ।
हवें योजण्या नेमक्या योजनेसी ।।
जसा कंस-लंकेश-विध्वंस साजे ।
तसा प्रत्ययो आज कां ना विराजे ? ॥ १५ ॥

किती सांगणें ? सांगणें फार झालें ।
अतां दास्य हें पाहिजे पूर्ण मेलें ॥
तयासाठिं ही एक आहे कसोटी ।
हवे व्हावया यज्ञ कोट्यानुकोटी ॥ १६ ॥

भरःस्थानिचा रक्तिमा कीर्ति-भावी ।
सदा प्रेमळा लेइ स्वातंत्र्यदेवी ।।
अहा मंगलाची करायास वारी ।
हवी हात-छाती–मतींची तयारी ॥ १७ ॥

उफाळी मनाची मुळाचेंहि मूळ ।
बनें तारका वारुची पायधूळ ॥
स्वतंत्रध्वजा लागुनी विश्व वंदी ।
प्रताप प्रकाशे जिथें ईश छंदी ॥ १८ ॥

---

श्रीभुवनेश्वरी प्रेस, कराड.

# प्रगतीची व्याख्या.

( कऱ्हाड येथें सुरू झालेल्या सरस्वती-व्याख्यान मालेंतील शेवटचें व्याख्यान श्री. सोनूताई काळे यांचें “ बंधनांची इष्टानिष्टता” या विषयावर श्री. शिराळकर यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यावेळीं )

“ प्रगतीची निश्चित व्याख्या ठरत नाहीं यामुळेंच सर्व प्रकारचे वाद निर्माण होत आहेत. एकदा प्रगतीची व्याख्या ठरली म्हणजे फारसें महत्त्व रहात नाहीं. क्रांति करणारा नेहमीं बंधनाच्या पलीकडे असतो. याला ३०० रूबल्सवर काम करणाऱ्या लेलिनचें उदाहरण देतां येईल. आपल्या महाराष्ट्रांतही ज्यावेळीं पुनर्विवाह हा भयंकर गुन्हा समजला जात असे त्यावेळीं श्री. अण्णासाहेब कर्वे यांनीं पुनर्विवाह करून एक सामाजिक बंधन झुगारून दिलें. प्रगतीची व्याख्या ज्याच्यापुढें स्पष्ट असते तो बंधनाच्या पलीकडे जातो; व प्रगतीच्या मार्गावर झपाट्यानें पुढें जाऊन तोच समाजाला नवीन बंधनें घालूं शकतो. पण ही प्रगतीची व्याख्या ठरावयाची कशी ? माझ्या मतें, ‘ व्यक्ति, कुटुंब आणि समाज यांनीं चांगल्या तऱ्हेनें जगावयाचें कसें हें ज्यानें ठरेल तीच खरी प्रगती होय. ’ ज्याच्या अंगीं कर्तबगारी आहे तो सर्व बंधनें तटातट् तोडून पुढें निघून जातो. पुढें जातांना मेलों तरी पर्वा नाहीं असें त्याला वाटतें. आपली संस्कृति कुजलेली नाहीं, ती प्रगतिपर आहे म्हणूनच इतके दिवस टिकून राहिली आहे. ”

[ सातारा, ऐक्य — तारीख २९, आक्टोबर, १९३३ ]

महाराष्ट्रांतील प्रमुख पत्रांनी नावाजलेलें आणि
नागपूरसंमेलनाचे अध्यक्ष नाटयाचार्य खाडीलकर यांनीं
" सर्वोपयोगी व बालोपयोगी " म्हणून गौरविलेलें
श्री. पु. पां. गोखले यांचें व्याख्यान

## " शाळसोडल्यावर-- "

प्रत्येक मुलाच्या हातीं पालकानें द्यावें. किं, अर्धा आणा.
२ ललतलहरी ( किं. २ आ. ) ३ देवी सुशील ( ०॥. आ. )
४ झाकले माणिक ( किं. ८ आ. ) ५ साक्रेटीस आणि आगरकर
( ०॥. आ. ) ६ आगरकरांशीं ओळख ( किं. २ रु. )
७ निरोप, ८ कारागीर ( किं. १० आ. ) व

## गोखले आणि—

( स्फूर्तीप्रद व्याख्यानें ) किं. ०॥।. आणा.
हीं श्री. पु. पां. गोखले, कऱ्हाड यांचीं पुस्तकें वाचा व संग्रहीं ठेवा.

---

## शारदा-सदन.

सुंदर स्वभावचित्रें, उद्बोधक निबंध, रसाळ कविता, मार्गदर्शक गोष्टी, सामाजिक चिकित्सा व राजकीय ध्येयसंवर्धन यांचा मेळ असणारें हें पुस्तक केवळ आठ आण्यांत मिळेल अभ्युदयाच्या वर्गणीदारांस सहा आण्यांत मिळेल. [ मॅनेजर- अभ्युदय, कऱ्हाड.

---

प्रकाशकः- पु. पां. गोखले, कऱ्हाड.
मुद्रकः— डॉ. ना. पां. कोल्हापुरे, श्रीलक्ष्मी प्रेस, कऱ्हाड.